RNI No. MAHBIL/2009/37831




# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ५, अंक १५२(७)] गुरुवार, नोव्हेंबर २८, २०१९/अग्रहायण ७, शके १९४१ [पृष्ठे १६, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ४२८**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

## ग्रामविकास विभाग

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मंत्रालय, मुंबई ४०० ००१, दिनांक २८ नोव्हेंबर २०१९

## अधिसूचना

**महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम.**

क्रमांक व्हीपीएम. २०१६/प्र.क्र. १६६ /पंरा ४ (२२).— महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, (१९५९ चा ३) याच्या कलम १७६ च्या पोट-कलम (२) च्या खंड (सव्वीस) व्दारे प्रदान करण्यात आलेल्या व या बाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम, १९६० यांत आणखी सुधारणा करण्याचे योजिलेल्या पुढील नियमांचा मसुदा हा, त्यामुळे बाधा पोचण्याची शक्यता असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीकरिता, उक्त अधिनियमाच्या कलम १७६ चे पोट-कलम (४) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे, याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे; आणि याद्वारे अशी नोटीस देण्यात येत आहे की, उक्त मसुदा महाराष्ट्र शासनाकडून दिनांक १४ डिसेंबर २०१९ रोजी किंवा त्यानंतर विचारात घेण्यात येईल.

२. उक्त मसुद्याच्या संबंधांत कोणत्याही व्यक्तीकडून ज्या कोणत्याही हरकती किंवा सूचना, संबंधित जिल्ह्याचा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्याकडे उपरोक्त दिनांकापूर्वी प्राप्त होतील त्या शासन विचारात घेईल.

**नियमांचा मसुदा**

**१.** या नियमांना, महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी (दुसरी सुधारणा) नियम, २०१९ असे म्हणावे.

**२.** महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम, १९६० ( यात यापुढे ज्यांचा निर्देश " मुख्य नियम " असा करण्यात आला आहे ) यांच्या भाग चार च्या विद्यमान अनुसूची ऐवजी, पुढील अनुसूची दाखल करण्यात येईल :—

**" अनुसूची**

(नियम ३७ पहा)

| तपशील | किमान | कमाल |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| प्रत्येक यात्रेकरूस | ५ रुपये | २० रुपये". |

**३.** मुख्य नियमांच्या नियम ४३ मधील “ जिल्हा दंडाधिकाऱ्याच्या संमतीने ” या मजकुराऐवजी, “ संबंधित पोलिस ठाणे व तालुका दंडाधिकारी यांच्या संमतीने ” हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**४.** मुख्य नियमांच्या भाग ५ च्या विद्यमान अनुसूच्यांऐवजी, पुढील अनुसूच्या दाखल करण्यात येतील.-

**“ अनुसूची १**

(नियम ४२ पहा)

जत्रा व उत्सव यांवरील कराचा दर

| अ. क्र.<br>(१) | तपशील<br>(२) | किमान<br>(३) | कमाल<br>(४) |
|---|---|---|---|
| १ | अ) एक चौरस मीटरहून अधिक क्षेत्रफळ नसलेल्या प्रत्येक भूमिखंडास | प्रत्येक दिवसास ५ रुपये | प्रत्येक दिवसास १० रुपये |
| | ब) एक चौरस मीटरच्या प्रत्येक जादा भूमिखंडास किंवा त्याच्या भागास | प्रत्येक दिवसास १० रुपये | प्रत्येक दिवसास २० रुपये |
| २ | करमणुकीसाठी घेतलेल्या प्रत्येक १०० चौरस मीटर जागेस किंवा तिच्या भागास | प्रत्येक दिवसास ७५ रुपये | प्रत्येक दिवसास १२५ रुपये |

**अनुसूची २**

(नियम ४८ पहा)

करमणुकीच्या खेळावरील कराचे दर

| अ. क्र.<br>(१) | तपशील<br>(२) | किमान<br>(३) | कमाल<br>(४) |
|---|---|---|---|
| १ | प्रदर्शन, मनोरंजन, खेळ किंवा क्रीडांसाठी | प्रत्येक दिवसास २०० रुपये | प्रत्येक दिवसास ५०० रुपये |
| २ | नाटक, सर्कस किंवा सिनेमा यासाठी | प्रत्येक खेळास १० रुपये | प्रत्येक खेळास २०० रुपये ". |

**५.** मुख्य नियमांचा भाग ६, भाग ७ (अ), भाग ७ (ब), भाग ७ (क) आणि भाग ७ (ड) वगळण्यात येतील.

**६.** मुख्य नियमांच्या भाग ८ च्या विद्यमान अनुसूची ऐवजी, पुढील अनुसूची दाखल करण्यात येईल :-

**" अनुसूची**

(नियम ७५ पहा)

सामान्य आरोग्य रक्षण उपकराचे दर

| अ.क्र.<br>(१) | इमारतीच्या क्षेत्रफळाची मर्यादा<br>(२) | किमान (रुपये)<br>(३) | कमाल (रुपये)<br>(४) |
|---|---|---|---|
| १ | ३०० चौरस फूट क्षेत्रफळापर्यंतच्या सर्व इमारती, सदनिका | १०० | ५०० |
| २ | ३०० चौरस फुटांपेक्षा अधिक आणि ७०० चौरस फुटांपेक्षा कमी क्षेत्रफळ असलेल्या सर्व प्रकारच्या सर्व इमारती, सदनिका | २०० | ७०० |
| ३ | ७०१ चौरस फूट व त्यापेक्षा अधिक क्षेत्रफळ असलेल्या सर्व इमारती, सदनिका | ३०० | १००० ”. |

**७.** मुख्य नियमांच्या नियम ८० मधील उप-नियम (१) ऐवजी, पुढील उप-नियम दाखल करण्यात येईल :—

"(१) सामान्य पाणीपट्टी बसविण्याचे ठरविले असेल, अशा पंचायती, नियम ३ व ४ यांत विहित केलेली कार्यरीती अनुसरल्यावर, ती निश्चित करील अशा, परंतु या भागास जोडलेल्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या किमान दरापेक्षा कमी नसेल व कमाल दरापेक्षा अधिक नसेल अशा दराने पाणीपट्टी बसविल. "

**८.** मुख्य नियमांच्या भाग ९ मधील नियम (८३) नंतर, पुढील अनुसूची जादा दाखल करण्यात येईल :—

**"अनुसूची**

(नियम ८० पहा)

सामान्य पाणीपट्टीचे दर

| अ. क्र. (१) | इमारतीच्या क्षेत्रफळाची मर्यादा (२) | किमान (रुपये) (३) | कमाल (रुपये) (४) |
|---|---|---|---|
| १ | ३०० चौरस फूट क्षेत्रफळापर्यंतच्या सर्व प्रकारच्या इमारती, सदनिका | १०० | ५०० |
| २ | ३०० चौरस फुटांपेक्षा अधिक आणि ७०० चौरस फुटांपेक्षा कमी क्षेत्रफळ असलेल्या सर्व प्रकारच्या इमारती, सदनिका | २०० | ७०० |
| ३ | ७०१ चौरस फूट किंवा त्यापेक्षा अधिक क्षेत्रफळ असलेल्या सर्व प्रकारच्या इमारती, सदनिका | ३०० | १०००". |

**९.** मुख्य नियमांच्या भाग १० च्या विद्यमान अनुसूची ऐवजी पुढील अनुसूची दाखल करण्यात येईल :—

" **अनुसूची**

(नियम ८४ पहा)

बाजार आणि आठवडी बाजार यांवरील फी

| अ. क्र. (१) | तपशील (२) | किमान (३) | कमाल (४) |
|---|---|---|---|
| १ | ०.८३६१३ चौरस मीटरहून (9 चौरस फूट) अधिक क्षेत्रफळ नसलेला प्रत्येक भूखंड | प्रत्येक दिवसास ५ रुपये किंवा दरमहा ५० रुपये | प्रत्येक दिवसास २० रुपये किंवा दरमहा २०० रुपये |
| २ | ०.८३६१३ चौरस मीटर क्षेत्रफळ असलेल्या प्रत्येक जादा जागेस किंवा तिच्या भागास | प्रत्येक दिवसास १० रुपये किंवा दरमहा १०० रुपये | प्रत्येक दिवसास ४० रुपये किंवा दरमहा ४०० रुपये |
| ३ | व्यापाराच्या प्रयोजनांसाठी बाजारात किंवा आठवडयाच्या बाजारात आणलेल्या वस्तूबद्दल | प्रत्येक टोपलीस किंवा डोक्यावरील ओझ्यास (पेटी नसणाऱ्या) ५ रुपये किंवा प्रत्येक गोणीस १० रुपये किंवा प्रत्येक गाडीच्या बोजा मागे २0 रुपये | प्रत्येक टोपलीस किंवा डोक्यावरील ओझ्यास (पेटी नसणाऱ्या) २० रुपये किंवा प्रत्येक गोणीस ४० रुपये किंवा प्रत्येक गाडीच्या बोजा मागे ८० रुपये |
| ४ | विक्रीसाठी आणलेल्या प्रत्येक मेंढा, मेंढी, एडका, कोकरु, बकरा व करडू याबद्दल | प्रत्येक दिवसास ५ रुपये | प्रत्येक दिवसास १५ रुपये |
| ५ | विक्रीसाठी आणलेल्या बाब (४) मध्ये नमूद केलेल्या जनावरांव्यतिरिक्त प्रत्येक प्रकारच्या जनावराबद्दल. | प्रत्येक दिवसास १० रुपये | प्रत्येक दिवसास २५ रुपये |
| ६ | विक्रीसाठी आणलेल्या प्रत्येक पक्षाबद्दल | प्रत्येक दिवसास ५ रुपये | प्रत्येक दिवसास १० रुपये ". |

**१०.** मुख्य नियमाच्या भाग ११ च्या विद्यमान अनुसूची ऐवजी पुढील अनुसूची दाखल करण्यात येईल :—

**" अनुसूची**

(नियम ९३पहा)

| अ. क्र. (१) | तपशील (२) | किमान (३) | कमाल (४) |
|---|---|---|---|
| १ | गाडी | २४ तासांच्या किंवा त्यांच्या भागाच्या प्रत्येक मुक्कामास २ रुपये | २४ तासांच्या किंवा त्यांच्या भागाच्या प्रत्येक मुक्कामास १० रुपये. |
| २ | दुचाकी / तीनचाकी वाहने | २४ तासांच्या किंवा त्यांच्या भागाच्या प्रत्येक मुक्कामास ५ रुपये. | २४ तासांच्या किंवा त्यांच्या भागाच्या प्रत्येक मुक्कामास २० रुपये. |
| ३ | चारचाकी वाहने | २४ तासांच्या किंवा त्यांच्या भागाच्या प्रत्येक मुक्कामास १० रुपये. | २४ तासांच्या किंवा त्यांच्या भागाच्या प्रत्येक मुक्कामास ४० रुपये. |
| ४ | सहा चाकी व त्यावरील अवजड वाहने | २४ तासांच्या किंवा त्यांच्या भागाच्या प्रत्येक मुक्कामास २० रुपये. | २४ तासांच्या किंवा त्यांच्या भागाच्या प्रत्येक मुक्कामास ८० रुपये". |

**११.** मुख्य नियमांच्या नियम ९८ मध्ये, उप-नियम (२) मधील “१ रुपया” या मजकुराऐवजी, “२० रुपये ” हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**१२.** मुख्य नियमांच्या नियम ९९अ मध्ये, उप-नियम (७) मधील “३ रु. चाचणी फी” याऐवजी, “१०० रुपये चाचणी फी ” हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**१३.** मुख्य नियमांच्या भाग १२ च्या विद्यमान अनुसूची ऐवजी, पुढील अनुसूची दाखल करण्यात येईल.-

**" अनुसूची**

(नियम १०१ पहा)

**(१) भाग-अ .- मीटर पद्धतीव्यतिरिक्त इतर पद्धतीने पुरविण्यात येणाऱ्या पाणी पुरवठ्याचे दर.-**

| अ. क्र. | मीटर पद्धतीव्यतिरिक्त घरगुती वापरासाठी | किमान |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | १२ मिलीमीटर (१/२ इंच) व्यासाच्या नळजोडणीकरिता. | प्रतिवर्षी रुपये ७५० |
| २ | २० मिलीमीटर (३/४ इंच) व्यासाच्या नळजोडणीकरिता. | प्रतिवर्षी रुपये १५०० |

**मीटर पद्धतीविरहित बिगर घरगुती वापरासाठी**- मीटर पद्धतीविरहित बिगर घरगुती वापरासाठीचे पाण्याचे दर हे मीटर पद्धतीविरहित घरगुती वापरासाठी त्या त्या आकाराच्या नळजोडण्यांव्दारे केल्या जाणाऱ्या पाणी पुरवठयाकरिता निश्चित केलेल्या दराच्या दुप्पट राहतील.

**(२) भाग-ब मीटर पद्धतीने पुरविण्यात येणाऱ्या पाण्याचा पाणीपुरवठा दर.-**

| अ. क्र. (१) | तपशील (२) | किमान (३) |
|---|---|---|
| १ | **घरगुती वापरासाठी**<br>प्रत्येक १,००० लिटर्स किंवा त्याचा भाग | रुपये ५ अधिक १० पैसे अधिभार |
| २ | **बिगर घरगुती वापरासाठी**<br>प्रत्येक १,००० लिटर्स किंवा त्याचा भाग | रुपये १० अधिक १० पैसे अधिभार |

**(३) भाग-क खाजगी नळजोडणी फी(शुल्क).-**

| अ.क्र. (१) | तपशील (२) | किमान (३) |
|---|---|---|
| १ | १२ मिलीमीटर (१/२ इंच) व्यासाच्या नळजोडणीकरिता | प्रतिवर्षी रुपये १५० |
| २ | २० मिलीमीटर (३/४ इंच) व्यासाच्या नळजोडणीकरिता | प्रतिवर्षी रुपये ३०० |

**(४) भाग ड- ग्रामपंचायतीच्या लोकसंख्येच्या आधारे खाजगी नळ जोडणीसाठी अनामत रकमा.-**

| अ.क्र. | तपशील | किमान | कमाल |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | घरगुती वापरासाठी | रुपये ५०० | रुपये २००० |
| २ | बिगर घरगुती वापरासाठी | रुपये १५०० | रुपये ५०००". |

**१४.** मुख्य नियमांच्या भाग १३ च्या विद्यमान अनुसूची ऐवजी, पुढील अनुसूची दाखल करण्यात येईल.-

"**अनुसूची**

[ नियम १०७ (२) पहा ]

| अ.क्र. | तपशील | किमान | कमाल |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | **सिंचनाखेरीज इतर प्रयोजनांसाठी-** | | |
| | (अ) विटा व कौले यासाठी | दर हजार विटांना किंवा कौलांना रूपये २० | दर हजार विटांना किंवा कौलांना रूपये १०० |
| | (ब) धोब्यांनी कपडे धुण्यासाठी | प्रत्येक धोब्यामागे दरमहा रूपये १०० | प्रत्येक धोब्यामागे दरमहा रूपये ५०० |
| | (क) औद्योगिक किंवा वाणिज्यिक उपयोगासाठी- | | |
| | (एक) कारखाना अधिनियम, १९४८, यात व्याख्या केल्याप्रमाणे असलेल्या कारखान्यांसाठी. | दरमहा रूपये १००० | दरमहा रूपये १०००० |
| | (दोन) वरील बाब (एक) च्या कक्षेत न येणाऱ्या कोणत्याही गिरणीसाठी किंवा कारखान्यांसाठी. | दरमहा रूपये ५०० | दरमहा रूपये ७००० |
| २ | **सिंचनाच्या प्रयोजनासाठी** | दरमहा रूपये २०० | दरमहा रूपये १०००". |

**१५.** मुख्य नियमांच्या भाग १४ च्या विद्यमान अनुसूची ऐवजी, पुढील अनुसूची दाखल करण्यात येईल.-

**" अनुसूची**

(नियम ११५ पहा)

| अ.क्र. | तपशील | किमान | कमाल |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | सज्जा किंवा बाल्कनी | दर २.३२ चौ.मी. ला (२५ चौरस फूट) किंवा त्याच्या भागास दरवर्षी ५० रुपये | दर २.३२ चौ.मी. ला (२५ चौरस फूट) किंवा त्याच्या भागास दरवर्षी ५०० रुपये |
| २ | जमिनीवर हवारोधक फलक, पायफळी, वळचणी किंवा इतर प्रकारांचे उपांग बांधणे | दर २.३२ चौ.मी.ला किंवा त्याच्या भागास दरवर्षी २५ रूपये | दर २.३२ चौ.मी. ला किंवा त्याच्या भागास दरवर्षी २५० रुपये |
| ३ | उत्सव किंवा समारंभ प्रसंगी दहा दिवसांपर्यंत सार्वजनिक रस्त्यावर किंवा जागेवर तात्पुरती संरचना उभारण्याबद्दलची परवाना फी | दर ९.२९ चौ.मी. ला (१०० चौरस फूट) २० रूपये | दर ९.२९ चौ.मी. ला (१०० चौरस फूट) २०० रूपये |
| ४ | सार्वजनिक रस्ता किंवा जागा यांचा तात्पुरता भोगवटा करण्याबद्दलची परवाना फी | दर ९.२९ चौ.मी. (१०० चौरस फूट) अथवा त्याच्या भागास प्रत्येक दिवसास १० रूपये | दर ९.२९ चौ.मी. (१०० चौरस फूट) अथवा त्याच्या भागास प्रत्येक दिवसास १०० रूपये". |

**१६.** मुख्य नियमांच्या भाग १५ च्या विद्यमान अनुसूची ऐवजी, पुढील अनुसूची दाखल करण्यात येईल.-

**" अनुसूची**

(नियम ११८ पहा)

| तपशील | किमान | कमाल |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| विशेष स्वच्छता विषयक उपकर | दर संडासामागे किंवा शौचकूपामागे दरवर्षी रुपये ८० किंवा संडास किंवा शौचकूप यांचा वापर करण्यासाठी दर कुटुंबामागे दरवर्षी रु ८० आणि त्याच कुटुंबाकडून वापरण्यात येणाऱ्या अतिरिक्त संडासासाठी किंवा शौचकूपासाठी रुपये ४० | दर संडासामागे किंवा शौचकूपामागे दरवर्षी रुपये २५० किंवा संडास किंवा शौचकूप यांचा वापर करण्यासाठी दर कुटुंबामागे दरवर्षी रु २५० आणि त्याच कुटुंबाकडून वापरण्यात येणाऱ्या अतिरिक्त संडासासाठी किंवा शौचकूपासाठी रुपये १२५". |

**१७.** मुख्य नियमांच्या भाग १६ च्या विद्यमान अनुसूची ऐवजी, पुढील अनुसूची दाखल करण्यात येईल.-

**" अनुसूची**

(नियम १२४ पहा)

| अ.क्र. | किमान | कमाल |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | एका मलकुंडाचा वापर करणाऱ्या प्रत्येक घरामागे दरवर्षी रूपये ७० आणि त्याच मलकुंडाचा वापर करणाऱ्या प्रत्येक जादा घरामागे दरवर्षी रूपये ५० | एका मलकुंडाचा वापर करणाऱ्या प्रत्येक घरामागे दरवर्षी रूपये १५० आणि त्याच मलकुंडाचा वापर करणाऱ्या प्रत्येक जादा घरामागे दरवर्षी रूपये १०० |
| २ | एका मलकुंडाचा वापर करणाऱ्या प्रत्येक पथिकाश्रमामागे किंवा भोजनालयामागे दरवर्षी रुपये १०० आणि त्याच मलकुंडाचा वापर करणाऱ्या प्रत्येक जादा पथिकाश्रमामागे किंवा भोजनालयामागे दरवर्षी रुपये १०० | एका मलकुंडाचा वापर करणाऱ्या प्रत्येक पथिकाश्रमामागे किंवा भोजनालयामागे दरवर्षी रुपये २०० आणि त्याच मलकुंडाचा वापर करणाऱ्या प्रत्येक जादा पथिकाश्रमामागे किंवा भोजनालयामागे दरवर्षी रूपये २००". |

**१८.** मुख्य नियमांचा भाग १७ वगळण्यात येईल.

**१९.** मुख्य नियमांच्या नियम १३७ मधील, उप-नियम (१) ऐवजी, पुढील उप नियम दाखल करण्यात येईल.-

"(१) ज्या पंचायतीने दिवाबत्ती कर बसविण्याचे ठरविले असेल अशा पंचायतीने, नियम ३ व ४ यात विहित केलेली कार्यपद्धती अनुसरल्यावर ती निश्चित करील अशा, परंतु या भागास जोडलेल्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या किमान दरापेक्षा कमी नसेल व कमाल दरापेक्षा अधिक नसेल अशा दराने दिवाबत्ती कर बसविला पाहिजे.".

**२०.** मुख्य नियमांच्या भाग १८ च्या विद्यमान अनुसूची ऐवजी, पुढील अनुसूची दाखल करण्यात येईल.-

**"अनुसूची**

(नियम १३७ पहा)

दिवाबत्ती कर

| अ.क्र. | इमारतीच्या क्षेत्रफळाची मर्यादा | किमान (रुपये) | कमाल (रुपये) |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | ३०० चौरस फूट क्षेत्रफळापर्यंतच्या सर्व इमारती, सदनिका | १०० | ५०० |
| २ | ३०० चौरस फुटांपेक्षा अधिक आणि ७०० चौरस फुटांपर्यंतच्या क्षेत्रफळाच्या सर्व इमारती, सदनिका | २०० | ७०० |
| ३ | ७०१ चौरस फूट व त्यापेक्षा अधिक क्षेत्रफळ असलेल्या सर्व इमारती, सदनिका | ३०० | १०००". |

**२१.** मुख्य नियमांच्या भाग १९ च्या विद्यमान अनुसूची ऐवजी, पुढील अनुसूची दाखल करण्यात येईल.-

**" अनुसूची**

(नियम १४२ पहा)

| तपशील | किमान | कमाल |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| प्रत्येक प्राण्याच्या नोंदणीसाठी असलेला फीचा दर | ५ रुपये | २० रुपये". |

**२२.** मुख्य नियमांच्या नियम १४४ च्या खंड (ब) मधील "राज्य शासनाने" हा मजकूर वगळण्यात येईल.

**२३.** मुख्य नियमांच्या नियम १४५ मधील उप-नियम (१) ऐवजी, पुढील उप-नियम दाखल करण्यात येईल .—

"(१) ज्या पंचायतीच्या क्षेत्राअंतर्गत स्थित असलेल्या ठिकाणांना भेट देणाऱ्या अभ्यागतांवर प्रतिव्यक्ती कर बसविण्याचे तिने ठरविले असेल अशा पंचायतीने, नियम ३ व ४ यात विहित केलेली कार्यपद्धती अनुसरल्यावर ती निश्चित करील अशा, परंतु या भागास जोडलेल्या अनुसूचीत निर्दिष्ट केलेल्या किमान दरापेक्षा कमी नसेल व कमाल दरापेक्षा अधिक नसेल अशा दराने कर बसविला पाहिजे.".

**२४.** मुख्य नियमांच्या नियम १४७ मधील, उप-नियम (१) ऐवजी, पुढील उप नियम दाखल करण्यात येईल.-

"(१) संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा परिषद स्तरावर समन्वय समिती घटित करण्यात येईल आणि तिची रचना पुढीलप्रमाणे असेल.—

| | | |
|---|---|---|
| (एक) | मुख्य कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |
| (दोन) | महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचा जिल्हा स्तरीय प्रतिनिधी | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| (तीन) | वन विभागाचा जिल्हास्तरीय प्रतिनिधी | सदस्य |
| (चार) | पुरातत्व संचालनालयाचा विभागीय/जिल्हा स्तरीय प्रतिनिधी | सदस्य |
| (पाच) | उप विभागीय अधिकारी/उपजिल्हाधिकारी,<br>उप विभाग (महसूल व वन विभाग) | सदस्य |
| (सहा) | नगर रचना संचालनालयाचा जिल्हा स्तरीय प्रतिनिधी | सदस्य |
| (सात) | संबंधित पंचायत समितीचा गट विकास अधिकारी | सदस्य |
| (आठ) | संबंधित ग्रामपंचायतीचा सरपंच | सदस्य |
| (नऊ) | संबंधित जिल्हा परिषदेचा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) | सदस्य सचिव |

आवश्यकतेनुसार समन्वय समितीचा अध्यक्ष, विभागांच्या जिल्हास्तरीय प्रतिनिधींना निमंत्रित सदस्य म्हणून आमंत्रित करील."

**२५.** मुख्य नियमांच्या भाग वीस च्या विद्यमान अनुसूची ऐवजी पुढील अनुसूची दाखल करण्यात येईल.-

**" अनुसूची**

(नियम १४५ पहा)

| अ.क्र.<br>(१) | तपशील<br>(२) | प्रतिव्यक्ती किमान दर (रुपये)<br>(३) | प्रतिव्यक्ती कमाल दर (रुपये)<br>(४) |
|---|---|---|---|
| १ | प्रौढ व्यक्ती (१२ वर्षांवरील वयाची) | १० | २० |
| २ | मुले (वय ६ ते १२ वर्षे) | ५ | १० |
| ३ | शाळेच्या सहलीतील विद्यार्थी (शाळेच्या सहल प्रमुखाने सदर विद्यार्थी शाळेतील आहेत असे प्रमाणपत्र दिले पाहिजे.) | ३ | ५". |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**असीम गुप्ता,**
शासनाचे प्रधान सचिव.

## RURAL DEVELOPMENT DEPARTMENT

Bandhkam Bhavan, 25, Marzban Path, Fort, Mantralaya, Mumbai 400 001,
dated the 28th November 2019.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA VILLAGE PANCHAYATS ACT.

No.VPM. 2016/CR-166/PR.4(22).– The following draft of rules further to amend the Maharashtra Village Panchayats Taxes and Fees Rules, 1960, which the Government of Maharashtra proposes to make in exercise of the powers conferred by clause *(xxvi)* of sub-section (*2*) of section 176 of the Maharashtra Village Panchayats Act (III of 1959), and of all other powers enabling it in this behalf, is hereby published as required by sub-section (*4*) of section 176 of the said Act, for the information of all persons likely to be affected thereby; and notice is hereby given that the said draft will be taken into consideration by the Government of Maharashtra on or after the 14th day of December, 2019.

2. Any objections or suggestions which may be received by the Chief Executive Officer, Zilla Parishad in concerned District, from any person with respect to the said draft before the aforesaid date will be considered by the Government.

*DRAFT RULES*

1. These rules may be called the Maharashtra Village Panchayats Taxes and Fees (Second Amendment) Rules, 2019.

2. For the existing schedule of the part IV of the Maharashtra Village Panchayats Taxes and Fees Rules, 1960 (hereinafter referred to as "the principal Rules"), the following schedule shall be substituted, namely :–

"*Schedule*

(*See* rule 37)

| Particulars<br>(1) | Minimum<br>(2) | Maximum<br>(3) |
|---|---|---|
| Per Piligrim | Rs. 5 | Rs. 20". |

3. In rule 43 of the Principal Rules, for the words " with the approval of the District Magistrate" the words "with the approval of the concerned Police Station and Taluka Magistrate" shall be substituted.

4. For the existing schedule of the part V of the Principal Rules the following schedules shall be substituted, namely :–

"*Schedule I*

(*See* rule 42)

Rate of tax on Festivals and Fair

| Sr. No.<br>(1) | Particulars<br>(2) | Minimum<br>(3) | Maximum<br>(4) |
|---|---|---|---|
| 1 | (a) For every plot measuring not more than one square metre | Rs. 5 per day | Rs. 10 per day |
| | (b) For every additional plot of one square metre or part thereof | Rs. 10 per day | Rs. 20 per day |
| 2 | For space taken up for entertainment per 100 square metre or part thereof | Rs. 75 per day | Rs. 125 per day". |

*"Schedule II*
(*See* rule 48)
Rate of tax on Entertainments

| Sr. No. (1) | Particulars (2) | Minimum (3) | Maximum (4) |
|---|---|---|---|
| 1 | For exhibition, amusement, game or sport | Rs. 200 per day | Rs. 500 per day |
| 2 | For drama, circus or cinema | Rs. 10 per show | Rs. 200 per show". |

5. PART VI, PART VII(A), PART VII(B), PART VII(C) and PART VII(D) of the Principal Rules shall be deleted.

6. For the existing schedule of the PART VIII of the Principal Rules, the following schedule shall be substituted, namely :–

*"Schedule*

*(See* rule 75*)*

Rate of General Sanitary Cess

| Sr. No. (1) | Limit for the Area of Building (2) | Minimum (3) | Maximum (4) |
|---|---|---|---|
| 1 | All types of building, flat upto the area of 300 square feet | Rs. 100 | Rs. 500 |
| 2 | All types of building, flat having area above 300 square feet and below 701 square feet | Rs. 200 | Rs. 700 |
| 3 | All types of building, flat having area 701 square feet or more | Rs. 300 | Rs. 1000". |

7. In rule 80 of the Principal Rules, for sub-rule (*1*) the following sub-rule shall be substituted :–

"(1) A Panchayat which decides to levy a general water rate shall, after following the procedure prescribed in Rules 3 and 4, levy it at such rate as may be fixed by it but not below the minimum and exceeding the maximum rate specified in the Schedule annexed to this part.".

8. In PART IX of the Principal Rules, after rule (83) the following schedule shall be added, namely :–

*"Schedule*
(*See* rule 80)
Rate of General Water Rate

| Sr. No. (1) | Limit for the Area of Building (2) | Minimum (3) | Maximum (4) |
|---|---|---|---|
| 1 | All types of building, flat upto the area of 300 square feet | Rs. 100 | Rs. 500 |
| 2 | All types of building, flat having area above 300 square feet and below 701 square feet | Rs. 200 | Rs. 700 |
| 3 | All types of building, flat having area 701 square feet or more | Rs. 300 | Rs. 1000". |

9. For the existing schedule of the PART X of the Principal Rules, the following schedule shall be substituted, namely :–

"*Schedule*

(*See* rule 84)

| Sr. No. (1) | Particulars (2) | Minimum (3) | Maximum (4) |
|---|---|---|---|
| 1 | For every plot measuring not more than 0.83613 square metres (9 square feet). | Rs. 5 per day or Rs. 50 per month | Rs. 20 per day or Rs. 200 per month |
| 2 | For every additional space of 0.83613 square metres or part thereof. | Rs. 10 per day or Rs. 100 per month | Rs. 40 per day or Rs. 400 per month |
| 3 | For commodity brought to the market or weekly bazar for the purposes of trade | Rs. 5 per basket or head load (not being a bag) or Rs. 10 per bag or Rs. 20 per cart-load | Rs. 20 per basket or head load (not being a bag) or Rs. 40 per bag or Rs. 80 per cart-load |
| 4 | For every sheep, owe, ram, lamb, goat and kid brought for sale | Rs. 5 per day | Rs. 15 per day |
| 5 | For every kind of cattle other than those mentioned in Sr. No. (4) brought for sale | Rs. 10 per day | Rs. 25 per day |
| 6 | For every bird brought for sale | Rs. 5 per day | Rs. 10 per day". |

10. For the existing schedule of the PART XI of the Principal Rules, the following schedule shall be substituted, namely :–

"*Schedule*

(*See* rule 93)

| Sr. No. (1) | Particulars (2) | Minimum (3) | Maximum (4) |
|---|---|---|---|
| 1 | Cart | Rs. 2 for every halt of 24 hours or part thereof | Rs. 10 for every halt of 24 hours or part thereof |
| 2 | Two/Three wheeler vehicle | Rs. 5 for every halt of 24 hours or part thereof | Rs. 20 for every halt of 24 hours or part thereof |
| 3 | Four wheeler vehicle | Rs. 10 for every halt of 24 hours or part thereof | Rs. 40 for every halt of 24 hours or part thereof |
| 4 | Six wheeler and above vehicle | Rs. 20 for every halt of 24 hours or part thereof | Rs. 80 for every halt of 24 hours or part thereof ". |

11. In rule 98 of Principal Rules, in sub-rule (*2*), for the words, letters and figures "Rs.1" the words, letters and figures "Rs. 20" shall be substituted.

12. In rule 99A of Principal Rules, in sub-rule (*7*), for the words, letters and figures "A testing fee of Rs.3" the words, letters and figures "A testing fee of Rs.100" shall be substituted.

13. For the existing schedule of the PART XII of the Principal Rules, the following schedule shall be substituted, namely :–

"*Schedule*

(*See* rule 101)

(1) Part A.– Water supply rate for water supplied otherwise than through Meter System-

| Sr. No.<br>(1) | For Domestic use without Meter System<br>(2) | Minimum<br>(3) |
|---|---|---|
| 1 | For connection of water pipe of 12 millimetres (1/2 inch) diameter | Rs. 750 per annum |
| 2 | For connection of water pipe of 20 millimetres (3/4 inch) diameter | Rs. 1500 per annum |

*For Non-Domestic use without Meter System*.– The rate of non-domestic use shall be twice the rate fixed for supply of water through pipe connections of the respective sizes without Meter System for domestic use.

(2) Part B.- Water supply rate for water supplied through meter system –

| Sr. No.<br>(1) | Particulars<br>(2) | Minimum<br>(3) |
|---|---|---|
| 1 | **For Domestic Use**<br>For every 1,000 litres or part thereof | Rs. 5 plus surcharge of 10 paise |
| 2 | **For Non-Domestic Use**<br>For every 1,000 litres or part thereof | Rs. 10 plus surcharge of 10 paise |

(3) Part C.- Fees for private water pipe connection –

| Sr. No.<br>(1) | Particulars<br>(2) | Minimum<br>(3) |
|---|---|---|
| 1 | For connection of water pipe of 12 millimetres (1/2 inch) diameter | Rs. 150 per annum |
| 2 | For connection of water pipe of 20 millimetres (3/4 inch) diameter | Rs. 300 per annum |

(4) Part D.- Deposit for private water pipe connections based on the population of Village Panchayat -

| Sr. No.<br>(1) | Particulars<br>(2) | Minimum<br>(3) | Maximum<br>(4) |
|---|---|---|---|
| 1 | For Domestic use | Rs. 500 | Rs. 2000 |
| 2 | For Non-Domestic use | Rs. 1500 | Rs. 5000". |

14. For the existing schedule of the PART XIII of the Principal Rules, the following schedule shall be substituted, namely :–

"*Schedule*

(*See* rule 107(2))

| Sr. No. (1) | Particulars (2) | Minimum (3) | Maximum (4) |
|---|---|---|---|
| 1 | **For purposes other than irrigation-** | | |
| | (a) Bricks and tiles | Rs. 20 per thousand bricks or tiles | Rs. 100 per thousand bricks or tiles |
| | (b) Washing of clothes by washermen | Rs. 100 per month per washermen | Rs. 500 per month per washermen |
| | (c) For industrial or commercial use,- | | |
| | (i) By a factory as defined in the Factories Act, 1948 | Rs. 1,000 per month | Rs. 10,000 per month |
| | (ii) By any mill or factory not covered by (i) | Rs. 500 per month | Rs. 7,000 per month |
| 2 | For purpose of irrigation | Rs. 200 | Rs. 1000". |

15. For the existing schedule of the PART XIV of the Principal Rules, the following schedule shall be substituted, namely:-

"*Schedule*

(*See* rule 115)

| Sr. No. (1) | Particulars (2) | Minimum (3) | Maximum (4) |
|---|---|---|---|
| 1 | Sajja or balcony | Rs. 50 per annum per 2.32 square metres (25 square feet) or part thereof | Rs. 500 per annum per 2.32 square metres (25 square feet) or part thereof |
| 2 | Whether board, foot-board, cave or other projetion on land | Rs. 25 per annum per 2.32 square metres or part thereof | Rs. 250 per annum per 2.32 square metres or part thereof |
| 3 | Fee for a permit for temporary erection in a public street or place on occasions of festivals or ceremonies upto ten days | Rs. 20 per 9.29 square metres (100 square feet) | Rs.200 per 9.29 square metres (100 square feet) |
| 4 | Fee for a permit for temporary occupation of a public street or place | Rs. 10 per 9.29 square metres (100 square feet) per day or part thereof | Rs. 100 per 9.29 square metres (100 square feet) per day or part thereof". |

16. For the existing schedule of the PART XV of the Principal Rules, the following schedule shall be substituted, namely :–

"*Schedule*
(*See* rule 118)

| Particulars (1) | Minimum (2) | Maximum (3) |
|---|---|---|
| Special Sanitary Cess | Rs. 80 per annum per privy or latrine or Rs. 80 per family for using a privy or latrine and Rs. 40 per for additional privy or latrine used by the same family | Rs. 250 per annum per privy or latrine or Rs. 250 per family for using a privy or latrine and Rs. 125 per for additional privy or latrine used by the same family". |

17. For the existing schedule of the PART XVI of the Principal Rules, the following schedule shall be substituted, namely :–

"*Schedule*

Rule (124)

| Sr. No. (1) | Minimum (2) | Maximum (3) |
|---|---|---|
| 1 | Rs. 70 per annum for **every house** using one cess-pool and Rs. 50 per annum for every additional house using the same cess-pool | Rs. 150 per annum for **every house** using one cess-pool and Rs. 100 per annum for every additional house using the same cess-pool |
| 2 | Rs. 100 per annum for **every hotel or boarding house** using one cess-pool and Rs. 100 per annum for every additional hotel or boarding house using the same cess-pool | Rs. 200 per annum for **every hotel or boarding house** using one cess-pool and Rs. 200 per annum for every additional hotel or boarding house using the same cess-pool". |

18. Part XVII of the Principal Rules shall be deleted.

19. In rule 137 of the Principal Rules, for sub-rule (1) the following shall be substituted :–

"(1) A Panchayat which decides to levy a lighting tax shall, after following the procedure prescribed in Rules 3 and 4, levy it at such rate as may be fixed by it but not below the minimum and exceeding the maximum rate specified in the Schedule annexed to this part.".

20. For the existing schedule of the PART XVIII of the Principal Rules, the following schedule shall be substituted, namely :–

"*Schedule*
(*See* rule 137)
Rate of Lighting Tax

| Sr. No. (1) | Limit for the Area of Building (2) | Minimum (3) | Maximum (4) |
|---|---|---|---|
| 1 | All types of building, flat upto the area of 300 square feet | Rs. 100 | Rs. 500 |
| 2 | All types of building, flat having area above 300 square feet and below 701 square feet | Rs. 200 | Rs. 700 |
| 3 | All types of building, flat having area 701 square feet or more | Rs. 300 | Rs. 1000". |

21. For the existing schedule of the PART XIX of the Principal Rules, the following schedule shall be substituted, namely :–

"*Schedule*

(*See* rule 142)

| Particulars (1) | Minimum (2) | Maximum (3) |
|---|---|---|
| Rate of fee on the registration of each head of animal | Rs. 5 | Rs. 20". |

22. In rule 144 of the Principal Rules, in clause (b) the words "by the State Government" shall be deleted.

23. In rule 145 of the Principal Rules, for sub-rule (1) the following sub-rule shall be substituted, namely :-

"(1) A Panchayat which decides to levy a capitation tax on visitors visiting places situated within the area of panchayat, shall, after following the procedure prescribed in Rules 3 and 4, levy it at such rate as may be fixed by it but not below the minimum and exceeding the maximum rate specified in Schedule annexed to this part.".

24. In rule 147 of the Principal Rules, for sub-rule (1) the following sub-rule shall be substituted, namely :-

"(1) The co-ordination committee shall be formed at Zilla Parishad level the concerned District and its structure shall be as follows, namely :-

| | | |
|---|---|---|
| (i) | Chief Executive Officer | Chairman |
| (ii) | District level Representative of the Maharashtra Tourism Development Corporation | Member |
| (iii) | District level Representative of the Forest Department | Member |
| (iv) | Regional/District level Representative of the Archeological Directorate | Member |
| (v) | Sub-divisional officer / deputy collector, sub-division (Revenue and Forest Department) | Member |
| (vi) | District level Representative of the Town Planning Directorate | Member |
| (vii) | Block Development Officer of concerned Panchayat Samiti | Member |
| (viii) | Sarpanch of the concerned Village Panchayat | Member |
| (ix) | Deputy Chief Executive Officer (Panchayat) of the concerned Zilla Parishad | Member-Secretary |

As per requirement, Chairman of the co-ordination committee shall invite District level Representative of Departments as invitee Members.".

25. For the existing schedule of the PART XX of the Principal Rules, the following schedule shall be substituted, namely:-

"*Schedule*

(*See* rule 145)

| Sr. No. (1) | Particulars (2) | Minimum (3) | Maximum (4) |
|---|---|---|---|
| 1 | Adult (above the age of 12 years) | Rs. 10 | Rs. 20 |

| Sr. No. (1) | Particulars (2) | Minimum (3) | Maximum (4) |
|---|---|---|---|
| 2 | Child (between the age of 6 to 12 years) | Rs. 5 | Rs. 10 |
| 3 | Student of the school trip (In-charge of the school trip should produce certificate that the students are from school) | Rs. 3 | Rs. 5". |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

ASEEM GUPTA,
Principal Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.